महाराष्ट्र शासन

(तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई अंतर्गत, मरातंशिमं मुंबई संलग्नित)

# शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम

रिसोड रोड, लाखाळा, वाशिम - ४४४५०५

फोन नं (कार्यालय ) ०७२५२ - २३२२५२, २३२०८५ Fax No. 07252-232252

Email - office.gpwashim@dtemaharashtra.gov.in Web site: - www.gpwashim.edu.in

**क्रमांक:- शातंनिवा/जिमखाना-/२०२५-२६/10**

**दिनांक:- १६/०१/२०२६**

**प्रती,**

**मा. उपसचिव,**

**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,**

**विभागीय कार्यालय, नागपूर**

विषय : **" वाचन संकल्प महाराष्ट्राचा "** या उपक्रमांतर्गत राबविलेल्या विविध कार्यक्रमांचा अहवाल सादर करणेबाबत.

संदर्भ : आपल्या कार्यालयाचे पत्र क्र. मरातंशिमं/विकाना/का-२२/२०२५/१९ दिनांक : ०६/०१/२०२५

मा. महोदय,

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. २०/१२/२०२२४ च्या पत्रानुसार. दरवर्षी दि. ०१ जानेवारी ते दि. १५ जानेवारी ह्या कालावधीत **" वाचन पंधरवडा "** साजरा करण्यात येणार असून या कालावधीत **" वाचन संकल्प महाराष्ट्राचा "** हा उपक्रम राबविण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने, शासकीय तंत्रनिकेतन, वाशीम या संस्थेत विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

दिनांक ०१ जानेवारी २०२५ रोजी संस्थेच्या जिमखाना हॉल मध्ये अभ्यासक्रमाव्यतिरिक्त, महापुरुषांच्या आत्मचरित्रावर आधारित पुस्तके, व्यक्तिमत्व विकास, विज्ञान व शोध, यशस्वी व्यक्तिमत्व घडविण्याचा राजमार्ग इ. विषयांवर आधारित पुस्तकांचे प्रदर्शन ठेवण्यात आले. यावेळी, उपस्थित अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी आपल्या आवडीनुसार पुस्तकाची निवड करून पुस्तकांचे **सामुहिक वाचन** करण्यात आले. यावेळी संस्थेचे मा. प्राचार्य डॉ. श्री. बी. जी. गवलवाड, सर्व मा. विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात, **स्वयंचल अभि. शाखेतील विद्यार्थिनी कु. ईश्वरी वंजारी, कैवल्य इंगोले** यांनी आपण वाचन केलेल्या पुस्तकातील महत्वाच्या बाबी उपस्थितांसमोर मांडल्या. तसेच, **श्री. भागवत बी. लव्हाळे, अधि. पदार्थ विज्ञान** यांनी देखील वाचन केलेल्या पुस्तकातील ठळक बाबी सर्वांसमोर मांडल्या.

दिनांक १०/०१/२०२५ रोजी **पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा** आयोजित करण्यात आली होती. यामध्ये एकूण ३७ विद्यार्थांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमांतर्गत आयोजित चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी विविध विषयावर आपले मत मांडले. यामध्ये प्रथम ५ उत्कृष्ठ विद्यार्थ्यांची नावे निश्चित करून त्यांना संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात सत्कार करून सन्मानित करण्याबाबत मा. प्राचार्य यांनी घोषित केले.

दिनांक १५/०१/२०२५ रोजी **वाचन संवाद** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून **ग्रामगीताचार्य** या पदवीने सन्मानित तसेच साहित्य क्षेत्रात गाढा अभ्यासक व **कवी मा. श्री. राजेश्वर बबनराव लव्हाळे** ज्येष्ठ शिक्षक (गणित), राजमाता विद्यामंदिर, तामसी हे उपस्थित होते. त्यांनी, लेखक व वाचक यातील संबंध, मानवी जीवनामध्ये वाचनाचे फायदे इ. विषयावर व्याख्यान करून उपस्थित विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात, मा. प्राचार्य अध्यक्षस्थानी होते, तर श्री. राहुल महाजन, जिमखाना उपाध्यक्ष व श्री. भागवत लव्हाळे, अधि. पदार्थ विज्ञान यांनी समन्वयक म्हणून कामकाज पार पाडले.

" वाचन संकल्प महाराष्ट्राचा " या उपक्रमांतर्गत आयोजित विविध कार्यक्रमात संस्थेतील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी यांनी आपला सहभाग नोंदविला.

आपल्या माहितीस्तव व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर

**( डॉ. बी. जी. गवलवाड )**

**प्राचार्य**

**शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम**

" वाचन संकल्प महाराष्ट्राचा " या उपक्रमांतर्गत आयोजित विविध कार्यक्रमातील काही निवडक क्षणचित्रे



वाचन संवाद या कार्यक्रमासाठी आमंत्रित प्रमुख मार्गदर्शक श्री. राजेश्वर बा. लव्हाळे यांचा सत्कार करतांना मा. प्राचार्य डॉ. श्री. बी. जी. गावलवाड







सामुहिक वाचन





